**राज्यातील ३४ जिल्ह्यातील आरोग्य संस्थांच्या इमारत दुरुस्ती, ड्रेनेज दुरुस्ती, रंगरंगोटी इ. दुरुस्ती बांधकामांचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०२५/ प्र.क्र. १८४/पासु-२**
मंत्रालय, १० वा मजला, संकुल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मंत्रालय, मुंबई.
तारीख: ०१ जून, २०२६.

**वाचा :-**

सहसंचालक, आरोग्य सेवा रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः आआसे/ कक्ष-३/टे-६/ पुरवणीमागणी२६-२७(पावसाळी)/७३-९८/२६, दिनांक २२.०५.२०२६.

**प्रस्तावना :-**

राज्यातील ३४ जिल्ह्यातील आरोग्य संस्थांच्या इमारत दुरुस्ती, ड्रेनेज दुरुस्ती, रंगरंगोटी इ. दुरुस्ती बांधकामांचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील ३४ जिल्ह्यातील आरोग्य संस्थांच्या इमारत दुरुस्ती, ड्रेनेज दुरुस्ती, रंगरंगोटी इ. कामासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी अंदाजित खर्च रु.०५.०० कोटी (अक्षरी रुपये पाच कोटी फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास खालीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | बाब | अंदाजित किंमत (रु.लाखात) |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | इमारत दुरुस्ती, ड्रेनेज दुरुस्ती,रंगरंगोटी इ.कामे | ५००.०० |
| २ | पालघर | | ५००.०० |
| ३ | रायगड | | ५००.०० |
| ४ | पुणे | | ५००.०० |
| ५ | सातारा | | ५००.०० |
| ६ | सोलापूर | | ५००.०० |
| ७ | कोल्हापूर | | ५००.०० |
| ८ | सिंधुदूर्ग | | ५००.०० |
| ९ | सांगली | | ५००.०० |
| १० | रत्नागिरी | | ५००.०० |
| ११ | नाशिक | | ५००.०० |
| १२ | नंदूरबार | | ५००.०० |
| १३ | धुळे | | ५००.०० |

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | बाब | अंदाजित किंमत (रु.लाखात) |
|---|---|---|---|
| १४ | जळगांव | | ५००.०० |
| १५ | अहिल्यानगर | | ५००.०० |
| १६ | छत्रपती संभाजीनगर | | ५००.०० |
| १७ | जालना | | ५००.०० |
| १८ | परभणी | | ५००.०० |
| १९ | हिंगोली | | ५००.०० |
| २० | लातूर | | ५००.०० |
| २१ | धाराशिव | | ५००.०० |
| २२ | बीड | | ५००.०० |
| २३ | नांदेड | | ५००.०० |
| २४ | अकोला | | ५००.०० |
| २५ | अमरावती | | ५००.०० |
| २६ | बुलढाणा | | ५००.०० |
| २७ | यवतमाळ | | ५००.०० |
| २८ | वाशिम | | ५००.०० |
| २९ | नागपूर | | ५००.०० |
| ३० | चंद्रपूर | | ५००.०० |
| ३१ | गडचिरोली | | ५००.०० |
| ३२ | वर्धा | | ५००.०० |
| ३३ | भंडारा | | ५००.०० |
| ३४ | गोदिया | | ५००.०० |
| | **एकूण** | | **१७०००.००** |

२. उपरोक्त अंदाजपत्रकाची प्रशासकीय मान्यता पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

**<u>अटी व शर्ती</u> :-**

१) इमारतीचे आराखडे हे सार्वजनिक बांधकाम विभाग/शासकीय इमारतीच्या अनुज्ञेय मानकास अनुसरुन असण्याची खातरजमा करावी. अशा नकाशांना व वास्तुमांडणी आराखडयास शासनाचे वास्तुशास्त्रज्ञ यांची मान्यता घेण्यात यावी.

२) इमारत बांधकाम करण्यापूर्वी विदयुतीकरणाच्या कामासाठी मुख्य अभियंता (विदयुत) व स्थापत्यांच्या कामासाठी मुख्य अभियंता (स्थापत्य) यांची तांत्रिक मंजुर घेण्यात यावी.

३) कामासाठी निविदा मागविण्यापूर्वी सदर कामास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

४) बांधकामासाठी उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययामधून सदर कामास निधी उपलब्ध करुन देण्याच्या अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.

६) क्षेत्रिय जागेच्या परिस्थितीनुसार व आरोग्य संस्थांच्या आवश्यकतेनुसार प्रस्तावित कामाच्या किंमतीमध्ये अनावश्यक वाढ करण्यात येवू नये.

७) सदरचे अंदाजपत्रक हे ढोबळ नमुना अंदाजपत्रक असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिकदृष्ट्या मान्यता ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या त्यात्या- क्षेत्राच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल.

८) स्थानिक ग्रामीण नगर विकास संस्थेच्या संबंधित नियमानुसार बांधकाम परवानगी तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांची राहील.

९) शासनाच्या प्रचलित नियमानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

१०) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१ दि. १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

११) रुग्णालयाचे नकाशे तपासून नकाशांमध्ये रुग्णालयासाठी आवश्यक ऑक्सिजन पाईपलाईन, एअर कंडीशनरसाठी जागा व त्यांच्या duct चे नियोजन, दिव्यांगांकरीता करावयाच्या सोयीसुविधा, त्या व्यक्तींसाठी रुग्णालयात करावयाचे पथ-वे इ. तसेच याबाबतची Functionality विचारात घेवून रुग्णालयाचे नकाशे सुधारीत करण्यात यावेत. तसेच रुग्णालय डिझायनिंग मधील तज्ञ व्यक्ती व रुग्णालयाशी संबंधित डॉक्टर व कर्मचारी यांचेशी चर्चा करुन त्यानुसार रुग्णालयाचे नकाशे सुधारित करण्यात यावेत.

१२) केंद्र शासनाकडून निर्गमित IPHS च्या २०२२ च्या मार्गदर्शक सुनचांनुसार अंदाजपत्रकामध्ये सुधारणा समाविष्ट करुन प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीच्या मर्यादेत राहून इमारतीचे बांधकाम करण्यात यावे.

१३) प्रस्तावित करण्यात आलेल्या इमारतीचे जोते क्षेत्रफळ व शासकीय इमारती यांच्या अनुज्ञेय मानकाप्रमाणे असल्याची खातरजमा करण्यात यावी.

१४) क्षेत्रियस्तरावर सदर बांधकामाचा संबंधित उपसंचालक आरोग्य सेवा व जिल्हा शल्य चिकित्सक यांनी वेळोवेळी आढवा घ्यावा.

१५) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.बीडीजी२०१७/प्र.क्र.६०/इमा-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करावी.

१६) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुनच सदर कामाच्या निविदा सुचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

३. सदर कामावरील खर्च मागणी क्रमांक- एच-८, "मुख्य लेखाशिर्ष - ४२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च, ०१- नागरी आरोग्य सेवा(वैद्यकीय सहाय्य) ,११० - रुग्णालय व दवाखाने ,(१) (अ ,इमारती -पंचवार्षिक योजनांतर्गत योजना -((००) (०१)- मोठी बांधकामे (४२१० ००१४), ५३ - मोठी बांधकामे" या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ व दिनांक २० सप्टेंबर, २०१९ सोबतच्या परिशिष्ट भाग-पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १, परिच्छेद क्र.१३४ (१) नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६०१११३९५३४२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAVITA PRADIP PISE

Digitally signed by KAVITA PRADIP PISE
DN: cn=KAVITA PRADIP PISE, o, ou, email=kavita.pise@nic.in, c=US
Date: 2026.06.01 12:51:39 +05'30'

**( कविता पिसे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये ( राज्यस्तर ), मुंबई.
४. उपसंचालक, आरोग्य सेवा, सर्व परिमंडळे.
५. सहाय्यक संचालक ( लेखा व लेखापरिक्षा ), आरोग्य सेवा, पुणे.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सर्व
७. जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.
८. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सर्व.
९. निवडनस्ती ( पासु-२ ).